नांदेड जिल्ह्यातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या
मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत
अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर
करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक
सुजित विठ्ठलराव कमलाकर
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्गदर्शक
प्रा. डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलुर

संशोधन केंद्र
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

डिसेंबर २०२२

प्रस्तावना (Introduction)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी १९५१ मध्ये आर्थिक नियोजनाचा स्वीकार करून मिश्र अर्थव्यवस्था स्वीकार करण्यात आली वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे आर्थिक विकास होण्यासाठी आर्थिक घटकाचा विकास होणे आवश्यक असते भारत का विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. आजच्या प्रगतशील जगाची मुख्य- समस्या ही आर्थिक विकासाची आहे. सामान्यतः आर्थिक विकासाचा अर्थ सर्व आर्थिक क्षेत्रातील उत्पादनाचा स्तर वाढविणे, अधिक विस्तृत अर्थाने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, दारिद्रयता दूर करणे आणि सामान्य जीवनस्तरामध्ये वाढ करणे होय. दारिद्रय, बेकारी यासारख्या आर्थिक समस्या दूर करून प्रत्येक व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे असते व त्याच्या माध्यमातूनच आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो नवीन आर्थिक धोरणानंतर लहान व्यवसायीकाचे अस्तीत्व धोक्यात आले. मोठ्या व्यवसायीकाबरोबर स्पर्धा करणे कठीण झाले म्हणून बरेचसे लहान व्यवसाय संपुष्टात आले होते.

देशाच्या आर्थिक विकासासाठी सरकारला लहान, मध्यम व मोठ्या उद्योगाचा विकास करावा लागतो रोजगार उपलब्ध करून देणे सरकारचे महत्वाचे कार्य आहे. त्यासाठी वित्तीय धोरणाचा, योजनाचा अवलंब केला जातो. लहान व्यवसायीकास वित्त पुरवठा करणे, स्वयं रोजगार निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे एक महत्वाची योजना राबविली जाते ती म्हणजे प्रधानमंत्री मुद्रा योजना होय. MUDRAचे विस्तारीत रूप म्हणजे micro units Development and Refinancing Agency Ltd. होय. २०१५ - १६ च्या अर्थसंकल्पानुसार २०००० कोटी रुपयाची गुंतवणूक करून मुद्रा बँक उभारण्याची घोषणा करण्यात आली, बँकेअंतर्गत ३००० कोटी रुपयाचा पतहमी निधी उभारण्याची घोषणा करण्यात आली मुद्रा बँकेची कंपनी म्हणून कोटा रुपयाचा मार्च २०१५ मध्ये कंपनी कायदा २०१३ अंतर्गत आणि गैरबँकिंग वित्तीय कंपनी म्हणून ७ एप्रिल २०१५ रिझर्व बँक कायदा अंतर्गत नोंदणी करण्यात आली, फेब्रुवारी २०१५मध्ये अर्थसंकल्पीय भाषणात वित्तमंत्री अरुण जेटली यांनी ही योजना मांडली. त्यानुसार मार्च २०१५

मध्ये मुद्राची स्थापना सिडबीची संपूर्ण मालकाची संलग्न संस्था म्हणून एक पब्लिक लिमिटेड कंपनी म्हणून करण्यात आली ८ एप्रिल, २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदीनी मुदाच्या स्थापनेबरोबरच 'प्रधानमंत्री मुद्रा योजनेची घोषणा केली. या योजनेची दोन उद्दिष्टे आहेत. प्रथम, स्वयंरोजगारासाठी सोपे कर्ज. दुसरे म्हणजे छोट्या उद्योगाद्वारे निर्माण करणे होय.

प्रधानमंत्री मुद्रा योजनेपूर्वी (PMMY) छोटया उदयोगांसाठी बँकेतून कर्ज घ्यावे लागत असे त्यासाठी बऱ्याच औपचारिकता पूर्ण कराव्या लागत कर्जाची हमी देखील आवश्यक होती. यामुळे बऱ्याच लोकांना उद्यम सुरु करायचा होता, परंतु बँकेकडून कर्ज घेण्यास टाळाटाळ होत होती. म्हणून अशा लहान व्यवसायीकाना, स्वयंरोजगारासाठी सोप्या पद्धतीने कर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे होते ही गरज पूर्ण करण्यासाठी या योजनेची निर्मीती करण्यात आली. प्रस्तुत संशोधन विषयामध्ये नांदेड जिल्हातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा अभ्यास केला जाणार आहे. या योजनेतर्गत दिले जाणारे कर्ज, लाभार्थी, योजना सुरु झाल्यापासून योजनेच्या यश-अपयश, विकास धोरण अशा अनेक बाबीचा विस्तृत पद्धतीने अभ्यास केला जाणार आहे.

संबंधीत संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Literature)

प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरून पुर्वी झालेल्या संशोधन संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे संदर्भ साहित्यात विविध संशोधकांनी केलेले शोध प्रबंध, लघुशोध प्रबंध, संशोधन लेख, मुलभूत ग्रंथ, शासकीय अहवाल, आदिचा आढावा संदर्भ साहित्याच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

१. **गुप्ता (२०१५)** : प्रधानमंत्री मुद्रा योजनेची कार्य आणि जबाबदारी यावर आधारीत लिखाण केले आहे. या माध्यमातून वित्तीय पुरवठा छोट्या उदयोगाना करून त्यांचा विकास करण्यावर भर दिला आहे

२. रॉय (२०१६) : छोट्या व्यवसायात किंवा सूक्ष्म वित्तीय संस्थामध्ये मुद्रा बँकेचे महत्व काय आहे. योजनेअंतर्गत मंजूर होणारे कर्जाची विभागणी वेगवेगळ्या

कर्जदारात केली जाईल म्हणजेच भारतातील लहान उदयोगातील योजनेचे महत्व अधोरेखित केले आहे.

३.कविता आणि बाग (२०१६) : यानी मुद्रा बँकेसंदर्भात सार्वजनिक क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील बँकेचा तुलनात्मक अभ्यास पंतप्रधान मुद्रा योजनेच्या अमलंबजवणीसाठी केला आहे.

४.गोधा आणि नमा (२०१७) : वित्तीय वर्ष २०१५ - १६ आणि २०१६ - १७ या कालावधीमध्ये राजस्थान राज्यामध्ये मुद्रा योजनेची भूमिका, प्रगती, योजनेचे यश यावर आधारीत लिखाण केले आहे.

५. **राजीव आणि धिरेंदर (२०१७) :** यानी अर्ध शहरी भागात मुद्रा योजनेच्या कर्ज योजनेसंदर्भात सर्वेक्षण केले आहे तथ्याचे संकलन प्रश्नावलीच्या माध्यमातून छोट्या व्यवसायीकाकडून मिळवून काही युनिटस निवडून त्याद्वारे सर्वेक्षण पूर्ण केले आहे.

संशोधन विषयाची निवड :-

भारतासारख्या विकसनशिल देशात मुबलक प्रमाणात संसाधन असून देखील ज्ञानाच्या अभावामुळे त्याचा पूरेपूर वापर करता येत नाही. म्हणून देशात आर्थिक समस्या निर्माण होत आहेत दारिद्रय, बेकारी वाढती लोकसंख्या, उत्पन्न वाटपातील विषमता यामुळे आर्थिक विकासात बाधा निर्माण होत आहे. अर्थव्यवस्थेचा संतुलीत विकास साध्य करण्यासाठी सरकार वेळोवेळी कार्य करत असते लोकांना रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे महत्वाचे असते. यासाठी छोट्या व्यवसायीकांना प्रोत्साहन देऊन उदयोग चालू करणे महत्वाचे ठरते उद्योगातील स्पर्धेत अशा व्यवसायीकाना टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे मनोबल वाढविणे व उद्योगांना वित्तीय पुरवठा करून अशा उद्योगाच्या माध्यमातून नवीन रोजगाराची निर्मीती करणे गरजेचे असते. अशा छोटया व्यवसायीकाना उद्योग उभारण्यासाठी तसेच स्वंयरोजगार निर्माण करण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देणाचे कार्य केले जाते, त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळत असते. या दृष्टीकोनातून संबंधीत विषयाची निवड अत्यंत महत्वाची आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of study subject):-

नांदेड जिल्हा गोदावरीच्या खोऱ्यात महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्वेला वसलेला जिल्हा असुन याला लागून आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या सिमा आहेत. महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सीमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे जिल्हात एकूण १६ तालुके आहेत. जिल्हाचा उत्तर आणि ईशान्य भाग सातमाळाचे डोंगर व मुदखेडच्या टेकड्यांनी व्यापलेला असून जिल्हाच्या दक्षिण नैऋत्य सीमेवर बालाघाटचे डोंगर आहे.

नांदेड जिल्हाचा विकास करण्यासाठी शासनातर्फे विविध योजना वा विकास कार्यक्रम राबविले जातात. या विविध योजनेपैकी प्रधानमंत्री मुद्रा योजना एक महत्वाची आहे. तिच्या माध्यमातून जिल्हातील लोकांना अप्रत्यक्षपणे रोजगार पुरविले जाते व्यवसाय उभारण्यासाठी लागणारे सुलभ कर्ज कोणतेही तारण न ठेवता नवीन अथवा जुन्या व्यावसायीकांना ५० हजार ते १० लाख रुपये पर्यंत मिळू शकते. त्यामुळे स्वतःच्या कौशल्यात वाढ करून स्वयंरोजगार निर्मिती करू शकतात, या अनुषंगाने संबंधीत विषयाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (objectives of Research):-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील दिलेली उद्दिष्टे निश्चित करून त्या आधारे संशोधन करण्यात येणार आहे.

१) नांदेड जिल्हातील शासनाने चालवित असलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा अभ्यास करणे.

२) प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या लाभार्थ्याचे अध्ययन करून त्या अंतर्गत राबविले जाणारे मुद्रा योजनेच्या कर्ज वाटपच्या विश्लेषणाचा अभ्यास करणे.

३) योजनेच्या माध्यमातून होणारा वित्तीय पुरवण्याचा अभ्यास करणे.

४) प्रधानमंत्री मुद्रा योजनाच्या अंतर्गत निर्माण होणाऱ्या नवीन स्वयंरोजगाराचा अभ्यास करणे.

५) छोट्या व्यवसायीकाच्या तसेच योजनेतील लाभार्थ्यांच्या जीवनात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

६) नांदेड जिल्ह्यातील शासनाने राबविलेल्या या योजनेच्या यश-अपयशाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये (Hypothesis of Research) :-

१) प्रधानमंत्री मुद्रा योजनेत लाभार्थ्यांना होणाऱ्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास करणे

२) प्रधानमंत्री मुद्रा योजनेला विविध वित्तीय संस्थेकडून होणाऱ्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास करणे

३) योजनेतील लाभार्थ्यांच्या सहभागामुळे नवीन व्यवसायात / उद्योगात वाढ होत आहे.

४) प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे.

५) प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

६) नवीन व्यवसायकापेक्षा जुन्या व्यवसायकाना अधिक प्राधान्य दिले जात आहे

संशोधन पद्धती (Research Methodology) :-

संशोधन करित असताना ते संशोधन, शास्त्रशुद्ध व अचूक व्हावे, संबंधीत विषयाची उद्दिष्ट्य साध्य करणे आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरूप संशोधन पद्धतीचा अवलंब करावा लागतो. म्हणून प्रस्तूत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. प्राथमिक माहितीच्या आधारे सांख्यकीय कोष्टके व आलेख यांच्या साहयाने लाभधारकानी उभारलेला विविध व्यवसायांचे निरीक्षण व लाभधारकांचा व्यवसायाबद्दल असलेला हेतू या संदर्भातील माहीती घेऊन विश्लेषणात्मक पद्धतीने (सरासरी पद्धतीने) स्पष्टीकरण केले जाणार आहे.

नमूना निवड पद्धत :-

नांदेड जिल्हातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा एक चिकित्सक अभ्यास. या संशोधन विषयावरील कार्यासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड प्रकारातील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. यासाठी नांदेड जिल्हातील १६ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील ३० लाभार्थी अशा एकून ४८० लाभधारकाची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection) :-

सामाजीक घटनाच्या अध्ययनामध्ये वैज्ञानीक पद्धतीचा उपयोग करून त्याआधारे वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन करावे लागते. त्याकरिता कोणत्याही घटनेच्या संबंधीत वास्तविक तथ्याचे संकलन करणे अतिशय महत्वाचे असते. प्रस्तुत संशोधनासाठी तथ्याचे संकलन दोन पद्धतीने केले

जाणार आहे.

प्राथमिक तथ्य (माहिती) :-

प्राथमिक तथ्य (माहिती) संकलीत करण्यासाठी मुलाखत, अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा वापर केला जाणार आहे. नांदेड जिल्हातील १६ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील ३० लाभार्थ्यांचा मुलाखतीद्वारे माहिती संकलीत केली जाणार आहे. याशिवाय गरजेनुसार प्रत्यक्षरित्या भेट देऊन मुलाखतीद्वारे माहिती संकलीत केली जाईल.

दुय्यम तथ्य (माहिती) :-

प्राथमिक तथ्य संकलीत केल्यानंतर प्रतुत संशोधन विषयाला अनुसरून दुय्यम तथ्य मिळविण्यासाठी दैनिक वृत्तपत्रे, संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध, विषयानुरूप मासीके, नियतकालीके, संशोधन लेख, शासनाचे वेळोवेळी प्रकाशीत होणारे वार्षीक अहवाल, विविध पुस्तके, कागदपत्रे, संपादीत लेख, माहिती पुस्तिका, संबंधीत मंत्रालयाचे अहवाल, इंटरनेट साहित्य व संकेतस्थळे अशा सर्व बाबीचा वापर दुय्यम तथ्य संकलनासाठी केला जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitations of the study) :-

संशोधन समस्येसंबंधी तथ्य संकलनासाठी संशोधन क्षेत्र निश्चित करणे आवश्यक असते. त्याशिवाय योग्य माहिती मिळविण्यास व संशोधनाची दिशा मिळणे अशक्य असते. शासन स्तरावर विविध योजना राबविल्या जातात. परंतु प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेली 'नांदेड जिल्हातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा एक चिकित्सक अभ्यास' हा अभ्यास विषय अत्यंत महत्वपूर्ण असून या संशोधन विषयाचा उपयोग समाजाला पर्यायाने देशाला निश्चितपणे होउ शकतो.

प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी हा २०१५ पासुन असणार आहे. या कालावधीमध्ये योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळालेला लाभ तसेच योजनेच्या यश-अपयशाचा शुक्ष्मपणे अभ्यास केला जाणार आहे. संबंधीत संशोधन विषय नांदेड जिल्हा पुरताच मर्यादित असणार आहे. त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा क्षेत्र नांदेड जिल्हातील मुद्रा योजनेसंदर्भातच सीमित राहील.

प्रकरणाची मांडणी (रूपरेषा) :-

प्रस्तुत संशोधन विषयात एकूण ५ प्रकरण असणार आहेत.

प्रकरण १ ले प्रस्तावना

प्रकरण २ रे संबंधीत संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ३ रे नांदेड जिल्हयातील भौगोलिक आणि आर्थिक स्थिती

प्रकरण ४ थे नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे संख्यात्मक विश्लेषण

प्रकरण ६ वे निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ सूची (bibliography) :-

१. गुप्ता, एस. (२०१५) मुद्रा : मध्यम आर्थिक समावेशनाचा अभाव, भारतीय उपयोजीत संशोधन जर्नल, ५ (११),२७७ – २७९.

२. रॉय, ए. के. (२०१६) मुद्रा योजना - लहान व्यवसाय वित्तपुरवठा करण्यासाठी एक

धोरणात्मक साधन, व्यवस्थापन आणि संगणक अनुप्रयोगांमध्ये प्रगत संशोधनाचे आंतरराष्ट्रीय जर्नल, ४(१),६८ -७२.

३) कविता, पी आणि बाग, (२०१६) भारतातील बँका- उदयोजक आणि लहान व्यवसायांना वित्तपुरवठा करण्यासाठी तांत्रीक आणि प्रमाण कार्यक्षमता : DEA दृष्टीकोन (कार्यरत कागद क्र. IIMK/WPS/206/FIN/2016/18), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोझिकोड.

४) गोधा, ए., आणि नमा, डी. (२०१७). प्रधानमंत्री मुद्रा योजना : नवीन आर्थिक समावेशन उपक्रम अभियांत्रिकी तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि उपयोजित विज्ञानाचे आंतरराष्ट्रीय जर्नल, ५ (३), २०० – २०४.

५) राजीव, आणि धिरेंदर (२०१७). मुद्रा कर्ज योजनेचा शुक्ष्म आणि लहान मुद्रण युनिटवर परिणाम अभियांत्रिकी विज्ञान आणि संशोधन तंत्रज्ञानाचे आंतरराष्ट्रीय जर्नल, ६(७), ६८७ - ६९१.

६) ढमढेरे एस (२०१५). अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे

७) बोधनकर सुधीर (१९९९) : सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८) चारूलता लोंढे, (२०२२) "भारतातील उद्योग विकासामध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजनेची भूमिका", व्यवस्थापन आणि उपयोजित विज्ञानाचे आंतरराष्ट्रीय जर्नल, पीपी १० - १४, खंड - ८, अंक - ३.

संकेतस्थळ (websites) १. www.mudra.org.in

२. www.udyamimitra.in

संशोधक

सुजित विठ्ठलराव कमलाकर

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र

विभागप्रमुख वै. धुंडा महाराज
देगलूरकर महाविद्यालय, देगलूर